मा. 1.0. क्र 2 भा

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण  **P.S.(ठाणे):** माळशिरस  **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0056  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/02/2019 03:11 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day(दिवस):** सोमवार  **Date From (दिनांक पासून):** 04/02/2019

**Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 04/02/2019

**Time From (वेळेपासून):** 17:15 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:15 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date (दिनांक ):** 05/02/2019  **Time (वेळ):** 03:11 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No. (नोंद** 004  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/02/2019 03:11 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्तळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 0.5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** माळशिरस,माळशिरस

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नांव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name (नाव):** दादासाहेब गोरख चव्हाण

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती का नाव)

(c) **Date/Year of Birth** (जन्म 1993  (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):  **Date of Issue** (अदा केल्याची तारीख):

**Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | इतर | 413107 |



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पटवर्धन कुरोली ,पंढरपुर,पंढरपूर ग्रामिण पोलीस स्टेशन,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पटवर्धन कुरोली ,पंढरपुर,पंढरपूर ग्रामिण पोलीस स्टेशन,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(I) **Occupation (व्यवसाय):**

(J) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पवनकुमार महादेव चंदनशिवे | | | 1. खळवे ,माळशिरस,वेळापूर ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | मुकुंद बलभीम साठे | | | 1. वेळापुर ,माळशिरस,वेळापूर ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 200 रू.च्या 5 चलनी नोटा लाच स्विकारून | 1,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 1,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

जबाब दि. 05.02.2019 मी दादासाहेब गोरख चव्हाण, वय 26 वर्षे धंदा- शेती रा.पटवर्धन कुरोली ता.पंढरपुर जि.सोलापुर समक्ष फिर्यादी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझे आई, भाउ व आज्जी सह राहण्यास असून आम्ही आमची शेती करून आमचे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो. मी तहसिलदार माळशिरस यांना, रोडव्हे सोल्युशन कंपनीस दगड व मुरुम करीता मा.जिल्हाधिकारी सो सोलापुर व आपल्या कार्यालयातुन किती हजार ब्रास दगड व मुरुम उचलणेचा (उत्खनन) परवाना दिलेला आहे. त्याचा कालावधी किती आहे, त्याची रयल्टीची रक्कम शासनाकडे किती जमा करण्यात आली आहे तसेच वरील उत्खननापोटी कंपनीला आतापर्यंत आपल्या कार्यालयाने किती दंड आकारला आहे या सर्व विषयाची संपुर्ण माहिती नकलेच्या अर्जान्वये सही शिक्क्यानिशी मिळणेबाबत दि.30/01/19 रोजी लेखीपत्र दिले आहे. नमुद नकलेचा अर्ज हा माळशिरस तहसिल कार्यालयातील रेकर्ड रुमला गेला होता, म्हणुन मी माहिती घेण्यासाठी दि.02/02/19 रोजी रेकर्ड रुम , तहसिल कार्यालय माळशिरस येथे गेलो असता तेथील दोन कर्मचारी चंदनशिवे व साठे यांनी मला वरील माहिती देण्यासाठी 1,000/-रु.लाच मागीतली, त्यांना लाच दिल्या शिवाय माझे काम होणार नसल्याने व त्यांना लाच देण्याची माझी अजिबात इच्छा नसल्याने मी ऍन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर या कार्यालयाचा फोन नंबर माहिती करुन घेवून त्यांना दि.04/02/19 रोजी माझी तक्रार असलेबाबत फोन केला यावरुन तेथील अधिकारी यांनी मला तुम्ही पंढरपुर माळशिरस रोडवर वाखरी जवळ येवुन तेथे थांबुन रहा तेथे आमची टिम तत्काळ त्या ठिकाणी येवुन तुमची गाठ घेईल असे कळवले. त्यावरुन मी माझ्या गावातुन निघुन वाखरी जवळ येवुन थांबुन राहिलो अंदाजे दिड दोन तासांनी श्रीमती कविता मुसळे, त्यांचे स्टाफसह सरकारी वाहनातुन येवुन मला भेटल्या त्यांचे सोबत दोन शासकिय पंच देखील होते तेथे श्रीमती कविता मुसळे पोलीस निरीक्षक ऍन्टी करप्शन ब्युरो सोलापुर यांच्या समक्ष मी माझी तक्रार सांगीतली, तसेच सापळा अधिकारी श्रीमती मुसळे यांनी माझ्या लेखी तक्रार दोन्ही पंचांना दाखवली. त्यावर व सोबतचे कागदपत्रावर दोन्ही पंचांनी व श्रीमती मुसळे यांनी सह्या केल्या. त्यानंतर श्रीमती मुसळे, पोलीस निरीक्षक ऍन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरवले. त्यासाठी मी व माझ्या सोबत पंच नं 1 सावळे यांनी तहसिल कार्यालय माळशिरस येथे जावून तेथील कर्मचारी चंदनशिवे व साठे यांची भेट घेवून त्यांच्याशी मी नकलेच्या अर्जाद्वारे मागीतलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबत चर्चा करण्याचे ठरले. त्यावेळी त्यांनी लाचेची मागणी केल्यास थोड्यावेळात आणून देत असल्याबाबत सांगावे, तसेच आम्हास व्हईस रेकर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकण्यात आले. तदनंतर आम्ही शासकिय वाहन क्र.एम.



Scanned by CamScanner

एच.13 बी क्यु 0019 मधुन माळशिरस गावी आलो तेथुन तहसिल ऑफिस माळशिरस च्या अगोदर थोडया अंतरावर आल्यानंतर वाहन थांबवण्यात आले, त्यानंतर पडताळणीबाबतच्या सविस्तर सुचना देवून मला व पंच सावळे यांना तहसिल ऑफिस माळशिरस कडे माझ्या गळ्यात व्हईस रेकर्डर शर्टचे आतील बाजूस अडकावून चालत पाठवले. त्यावरून मी व पंच नं 1 सावळे असे तहसिल कार्यालयातील सेतु कार्यालया जवळ गेलो तेथे साठे गाठ पडले त्यांचेकडे कामाचा विषय काढला असता साठे म्हणाले कि ते काम साहेबाच्या टेबलला आहे मी करायला लावतो त्यावेळी मी म्हणालो कि पैल 850/-रु.दिलेती आता किती, साठे म्हणाले दया तुमच्या हिशेबानी मी म्हणलो 1000/-रु.का तर साठे म्हणाले हां हां हां तेथे जवळच चंदनशिवे यांची गाठ घेतली त्यांचेकडे कामाचा विषय काढला असता त्यांनी काम होईल असे म्हणुन आमाला बी चार पैशाची अपेक्षा असती जी काय असेल ते आमच्या दोगातच असतय असे म्हणला त्यावेळी मी पैसे आणतो असे म्हणुन परत ऍन्टी करप्शन ची गाडी थांबली होती तेथे बाहेर आलो. तेथे श्रीमती मुसळे, पोलीस निरीक्षक ऍन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर यांनी माझ्या गळ्यातील व्हईस रेकडर काढून पंच सावळे व मला हकीकत विचारुन घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्त प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर श्रीमती मुसळे, पोलीस निरीक्षक ऍन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर यांनी व्हईस रेकडरमध्ये माझ्यात व साठे तसेच चंदनशिवे यांच्यात झालेले संभाषण ऐकले. त्यामध्ये चंदनशिवे व साठे यांनी 1000/-रु.लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर श्रीमती मुसळे, पोलीस निरीक्षक, ऍन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर यांच्या सुचनेवरून मी चंदनशिवे, कोतवाल व त्याना मदत करणारा साठे यांना देण्यासाठी 1000/- रूपये, त्यात 200/- रुपये दराच्या 5 नोटा दिल्या, सदर नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून त्यावर पंचानी व श्रीमती मुसळे, पोलीस निरीक्षक यांनी सहया केल्या, सदर नोटांना ऍन्टीथ्रासीन पावडर लावण्याचा, त्याचे प्रात्याक्षीक करण्याचा व सापळा कारवाईमध्ये करावयाच्या कामाच्या सुचना आम्हाला देण्यात आल्या. पुरवणी :- फिर्यादी दादासाहेब गोरख चव्हाण, वय 26 वर्षे धंदा- शेती रा.पटवर्धन कुरोली ता.पंढरपुर जि.सोलापुर यांचे दि.05.02.2019 रोजीचे फिर्यादी जबाबालगतचे असे.------------------------------------------------------------------------------------------

त्यानंतर यातील चंदनशिवे, कोतवाल व त्यास मदत करणारा साठे यांच्यावर तहसिल कार्यालय माळशिरस आवारातील सेतु कार्यालया जवळ लाचेचा सापळा आयोजीत केला. त्यामध्ये मी व पंच नं 1 सावळे असे दोघेजन चालत व आमच्या मागे योग्य अंतर राखुन उर्वरीत सापळा पथक चालत आमचे मागे आले. मी सेतु कार्यालया समोर आलो असता तेथे चंदनशिवे गाठ पडले त्यांचेकडे मी कामाचा विषय काढला असता त्यांनी डाव्या हाताचा अंगठा डावे हाताचे तर्जनीवर घासुन पैशाची मागणी केली त्यावेळी मी माझ्या शर्टचे खिशामधे ठेवलेल्या लाचेच्या नोटांची घडी उजव्या हाताने काढून चंदनशिवे यांच्या समोर धरली असता त्यांनी ती लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हाताने मोजत असता पंच सावळे यांनी केलेल्या नियोजीत इशाऱ्यावरुन सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी येवून चंदनशिवे यांना रंगेहात पकडले आहे, ती वेळ दि.04/02/19 रोजी 17.15वा.सु.ची होती. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष चंदनशिवे यांचे दोन्ही हातांची, अ.वा. दिव्याच्या निळे प्रकाशात योग्य तो अंधार करुन तपासणी केली असता त्यांचे दोन्ही हातांच्या बोटाच्या पेऱ्यावर व अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. तसेच को-या कागदावर नमूद केलेल्या नोटांच्या नंबरांशी पडताळणी करता ते तंतोतंत मिळून आले आहेत. तसेच सदर नोटांची देखील ऍ.वा.दिव्याचे निळ्या प्रकाशात तपासणी करता त्या नोटांवर देखील अ.पा.ची हिरवट चकाकी दिसून आली आहे. सदरच्या नोटा पुराव्याकामी जप्त करण्यात आलेल्या आहेत. सदर संपुर्ण कारवाई बाबत सविस्तर पंचनामा ऍन्टी करप्शन ब्युरो सोलापुर येथील कार्यालयात जावुन दि.04/02/19 रोजी पुर्ण करण्यात आला आहे. तरी लोकसेवक पवनकुमार महादेव चंदनशिवे, वय 44 वर्षे, कोतवाल, सजा-माळखांबी ता.माळशिरस, रा. मु.पो.खळवे ता.माळशिरस जि.सोलापुर यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन खाजगी इसम आरोपी मुकुंद बलभीम साठे, वय 32 वर्षे, रा.वेळापुर ता.माळशिरस जि.सोलापुर यांचे सहकार्याने त्यांना कायद्याने मिळावयाचे त्या खेरीज लाच म्हणून मी नकलेच्या अर्जाद्वारे मागीतलेली माहिती देण्यासाठी म्हणुन 1000/-रु.ची लाच स्विकारुन सांपत्तीक फायदा स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी पवनकुमार महादेव चंदनशिवे, वय 44 वर्षे, कोतवाल, सजा-माळखांबी ता.माळशिरस, रा. मु.पो.खळवे ता.माळशिरस जि.सोलापुर व खाजगी इसम आरोपी मुकुंद बलभीम साठे, वय 32 वर्षे, रा.वेळापुर ता.माळशिरस जि.सोलापुर यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7,12 प्रमाणे फिर्याद आहे. माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रींट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे. हा जबाब दिला स.ता.म समक्ष पोठाणे अंमलदार माळशिरस पो ठाणे

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे ASHOK Chandrasen **Rank (पद):** I (Inspector)
**No.(क्र.):** PCMAH63669 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned by CamScanner

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाम):** shivaji shankar shinde
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PBMAH56281



Scanned by CamScanner